**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# आंबेडकरी कवितेतील स्वातंत्र्यचिंतन

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय,
नळेगाव ता. चाकूर जि. लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारक्रांतीतून उदयाला आलेल्या दलित साहित्यात दलित कविता विपुल प्रमाणात लिहिली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य त्यांनी समाजबांधवांना केलेला उपदेश, त्यामुळे आत्मभान आलेला आंबेडकरी समाज, युगानुयुगे समाजावर होणारे अमानुष अन्याय-अत्याचार आणि त्याविरूध्द या समाजाने केलेला विद्रोह या विविध विषयांवर आंबेडकरी कवितेतून विपुल लेखन झाले. १९९० नंतर सामाजिक वर्तमान बदलले आंबेडकरी नेत्यांची झालेली फाटाफूट त्यांची स्वार्थलोलूप प्रवृत्ती, त्यांनी केलल्या तडजोडी, त्यामुळे या आंबेडकरी समाजाची झालेली फरफट आणि दिशाहीन झालेला हा समाज या सर्व परिस्थितीचे वर्णन १९९० नंतरच्या कवितेतून आले. याच दरम्यान खाऊजा हे धोरण आले. त्यामुळेही पुन्हा या देशातील सर्वसामान्य माणसाचे भवितव्य धोक्यात आले. या सर्व परिस्थितीचे अत्यंत ज्वलंत व दाहक चित्र आंबेडकरी कवितेने रेखाटले आहे. या सर्व विषयांसोबतच भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्याचे स्वातंत्र्योत्तर काळातील समजावर झालेले परिणाम, संसदीय लोकशाहीचे संविधान त्याची शासनकर्त्यांकडून झालेली पायमल्ली आणि त्यामुळे सर्वसामान्य जनतेची झालेली वाताहत हेही विषय आंबेडकरी कवितेतून ताकदीने मांडण्यात आले. आज तर 'स्वातंत्र्यचिंतन' हा आंबेडकरी कवितेतील अत्यंत महत्त्वाचा व चिंतनाचा विषय बनला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रमाने लिहिलेले स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि समान न्याय या आदर्श मूल्यांवर आधालेले संविधार भारताला दिले. आदर्श राष्ट्र निर्मितीसाठी अत्यंत सक्षम आणि समृध्द असणारे हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी त्यांनी देशाला बहाल केले. समतावादी, विज्ञाननिष्ठ एकसंघ असा भारतीय समाज बाबासाहेबांना अपेक्षित होता. या देशातील प्रत्येक माणसाच्या न्याय हक्काची तरतूद त्यांनी या संविधानात केली. याच दिवशी संविधानसभेत भाषण करताना 'हे संविधान राबविणारे लोक जर प्रमाणिक असतील तर एका आदर्श राष्ट्राची निर्मिती होईल आणि हे लोक जर अप्राणिक असतील तर मात्र राष्ट्राचे नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही.' त्यांनी दिलेला हा गर्भित इशारा तत्कालीन सत्ताधिशांनी गांभीर्याने लक्षात घेतला नाही आपल्या सोयीप्रमाणे व स्वार्थासाठी त्यांनी सत्तेचा वापर केला त्यामुळे दलित, शोषित, पिडित अशा सर्वसामान्य जनतेचे शोषण झाले. स्वांतत्र्यानंतरही पुन्हा एकदा येथील ही जनता दुःखाच्या खाईत लोटली गेली. याचे अत्यंत जिवंत चित्रण १९९० नंतरच्या आंबेडकरी कविंनी केले आहे.

खरे तर आंबेडकरी कवितेत या स्वातंत्र्याचिंतनाचा प्रारंभ पूर्वीच झाला आहे. नामदेव ढसाळासारख्या अत्यंत ताकदीच्या कवीने स्वातंत्र्यावर खूप गांभिर्याने लेखन केले आहे.

पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद भगोष्ट, स्वांतत्र्या कुठल्या गाढवीचं नाव आहे. असे त्यांनी रोकठोकपणे विचारले.

हे स्वातंत्र्य नाही रे हा पिंजरा पिळवणुकीचा
मूग गिळून पोसलेला

भारतीय सर्वसामान्य माणसांसाठी सत्ताधिशांनी संविधानाला डावलून येथील सर्वसामान्य माणसांचे शोषण केले. भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे या सर्वसामान्यासाठी कुचकामी ठरले आहे म्हणूनच ते या स्वातंत्र्याबद्दल म्हणतात.

हाण सख्या तुझीच बारी
लोकशाही गेली तर डेंगण्यामारी!

या स्वातंत्र्याचा सर्वसामान्यांना काहीच उपयोग होत नाही म्हणून हे स्वातंत्र्य गेले तरीही सर्वसामान्यांना त्याचे काहीच वाटणार नाही. असे नामदेच ढसाळांनी या काव्यपंक्तीमधून प्रकट केले आहे. ढसाळांच्या या काव्यातून या स्वातंत्र्याबद्दल संतापाची भावना व्यक्त झाली आहे या काळातील इतरही काही कविंनी स्वातंत्र्यामध्ये या देशातील सर्वसामान्य जनतेची झालेली अवहेलना

प्रकट केली आहे. १९९० नंतर तर सत्ताधिशांच्या गुंडशाहीला व झुंडशाहीला अत्यंत हिडीस रूप आले. त्यामुळे या सत्ताधिशांबद्दल संतापाची एक तीव्र लाट निर्माण झाली.

या स्वातंत्र्यात सर्वसामान्यांची दयनीय अवस्था चित्रित करताना आशालता कांबळे 'स्वातंत्र्याची पहाट' या कवितेत लिहितात.

स्वातंत्र्याची पहाट उगवतेय
दंगलीच्या ज्वाळात
त्यांची झळ दिसतेय
तुझ्या माझ्या डोळ्यात

स्वातंत्र्यानंतर तर देशात दंगलीची एक प्रचंड लाटच निर्माण झाली. या दंगली राजकारणी लोक निर्माण करतात व आपली पोळी भाजून घेतात. त्याची झळ मात्र सर्वसामान्याना बसते. स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली. तरीही या स्वातंत्र्याच्या राज्यात तलवारीचा खणखणाट, बॉम्बस्फोटाच्या कानठळ्या, गोळ्यांचा वर्षाव आणि धार्मिकतेच्या विळख्यातील धर्मयुध्दच येथील सर्वसामान्यांच्या अनुभपाला येताना दिसते. स्वांतत्र्याची पहाट हे सर्वसामान्याचे सुख घेऊन उगवली नाही, तर ती त्यांचे मरण घेवूनच उगवली आहे. असा ज्वलंत आशय या कवितेतून प्रकटताना दिसतो.

स्वातंत्र्याबद्दल विद्रोहाची भावना संयतपणे चित्रित करताना कवी दीपध्वज कोसादे 'स्वातंत्र्य' या कवितेत लिहितात

साडेतीन हजार वर्षाच्या गुलामगिरीसोबतच
स्वकियाचीही गुलामगिरी
लादली जाते
आता तुम्ही सांगा
आशा स्वातंत्र्यासाठी
पुन्हा लढायचे म्हटल्यावर
खरंच लढता येईल का?

कवीचा हा प्रश्न अंतर्मूख करणारा आहे स्वातंत्र्यसंग्रामाच्यावेळी स्वातंत्र्यात सर्वसामान्यांना सर्व काही मिळेल असेच येथील सर्वसामान्य माणसाला वाटले होते; परंतु आज हेच स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सामान्य माणसांला स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागत आहे. साडेतीन हजार वर्ष परकीयांच्या गुलामगिरीत असलेल्या सामान्य माणसाला स्वकीयांच्याही गुलामगिरीचाच प्रत्यय येताना दिसतो.

या देशातील फसलेल्या लोकशाहीची व त्यातील स्वातंत्र्याची मोजदाद करताना कवी किरण भिंगारदेव 'हिशोब स्वातंत्र्याचा' या कवितेत म्हणतात

साठ वर्ष स्वातंत्र्य भागून
भारत माझा थकला आहे
विंद्य-हिमाचल सहयागिरीवर
देश द्रोह उरला आहे.

ज्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग, बाबूगेनू यांनी अथक परिश्रम केले अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, रक्त सांडले. त्या क्रांतिकारकांच्या व स्वातंत्र्याची चळवळ उभारणाऱ्या तत्कालीन सर्व देशभक्तांच्या कार्याचा व विचारांचा वारसा हक्कही आता संपला आहे. या स्वातंत्र्यात सर्वसामान्यांना मात्र बंदुकीच्या गोळीचाच प्रत्यय येतो आहे. तीर्थ क्षेत्रातील देवांचे दर्शन महाग होत आहे शहरे समृध्द होत आहेत आणि शेतकरी आत्महत्या वाढत आहेत हे 'वर्तमान वास्तव' या कवितेतून आविष्कृत झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात या देशातील प्रत्येक जाती समुहातील माणसाला प्रतिष्ठा देऊन त्याच्या न्याय हक्काची व स्वातंत्र्याची तरतूद केली आहे. पण सत्तर वर्षे उलटूनही येथील आदिवासी माणसाचे दऱ्याखोऱ्यात आणि डोंगर दऱ्यातील राहाणे, त्यांची उपासमार, त्यांचे अज्ञान अजून संपले नाही, याचा प्रत्यय गंगाधर मेश्राम यांच्या 'एवढीच इनंती आहे' या बोली भाषेतून प्रभावीपणे व्यक्त झालेल्या कवितेतून येतो. ते लिहितात.

आमच्याच वाट्याला डोंगरदऱ्या अन् उपासमार का आली
जाऊ दे, पन पन्नास वरसं झाल्यानं सातंत्र्याचं फल
आता लई चांगलं पकलं असलं नायी?

जंगलात रानावनात व डोंगरदऱ्यात राहून अन्न मिळत नाही म्हणून फळे, कंदमुळे खाऊन तसेच शिकार करून त्यावरच जगणारा आदिवासी माणूस अजूनही दिसून यावा. हे चित्र या स्वातंत्र्याच्या देशात अत्यंत विसंगतीपूर्ण आहे. हे प्रत्ययाला येते. बाबासाहेबांना अपेक्षित असलेला आदिवासीचा विकास अद्यापपर्यंत तरी झाला नाही. याची खंत कवीने या कवितेतून व्यक्त केली आहे. आदिवाशीही एक दलितच आहे. तो तुडविला गेला आहे, भरडला गेला आहे, पिळला गेला आहे म्हणूनच तो आंबेडकरी कवीच्या विचारधोरचा पाईक असल्याचा प्रत्यय मेश्रामांच्या कवितेतून येतो.

हजारो वर्षांपासून परकियांच्या गुलामीत असणाऱ्या या देशाला अनेक संत महंत होऊन गेले. त्यांनाही या देशातील स्वातंत्र्याचा कधीच प्रत्यय आला नाही. गुलामीची ही युगानुयुगे चालत आलेली या देशातील परंपरा व्यक्त करताना कवी बाबूराव बागूल आपल्या 'हे स्वातंत्र्या तुकोबा, चोखोबाला तू दिसत नव्हतास' या कवितेतून लिहितात.

हे स्वातंत्र्या, तुका, चोखोबाला तू दिसत नव्हतास
भासमानही होत नव्हता
म्हणून ते वाळूच्या विठ्ठलाला
व्यथा वेदना सांगत होते

मोक्षप्राप्ती हे संताचे ध्येय होते म्हणूनच त्यांनी आजन्म विठ्ठलाची सेवा व भक्ती केली. ही भक्ती खरे तर मोक्षप्राप्तीसाठी म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व सूखप्राप्तीसाठीच होती, परंतु हे स्वातंत्र्य त्यांना कधीही मिळाले नाही ते जन्मभर मागत राहिले तरीही त्यांना ते मिळाले नाही. या देशात अजूनही रूजले नसलेले स्वातंत्र्य पारंपरिकतेने किती दुर्मिळ आहे. याचाच प्रत्यय बागुलांच्या कवितेतून येतो.

लोकशाही व स्वातंत्र्य आले ही केवळ आता अफवा वाटते अजून झोपडीत हे स्वातंत्र्य गेलेच नाही. अनेक वाड्या वस्त्यांमधील, झोपड्यांमधील, झोपडट्यांमधील, डोंगरदऱ्यांमधील लोक या स्वातंत्र्याची वाट अजूनही पाहात आहेत. परंतु ते स्वातंत्र्य त्यांना कोठेही दिसत नाही. ही भावना व्यक्त करताना प्रशांत वंजारे म्हणतात

तू आल्याची अफवा पसरली
त्याला आता कित्येक वर्षे उलटून गेलीत
किती उशीर होतोय तुला
आमच्याशी हस्तांदोलन करायला
उपभोगण्यासाठी काहीच राहिलं नाही शिल्लक
तसं आधीही नव्हतं काही

या देशातील सर्वसामान्य दलित, शोषित, पिडित माणूस हजारो वर्षांपासून दु:ख, दैन्य, दारिद्रय आणि जातीय शोषणात खितपत पडला आहे तो अजूनही त्याच अवस्थेत आहे. उलट त्याच्या अन्याय अत्याचारात वाढ झाली आहे. दलितांची तर आज अनेक हत्याकांडच रचले जात आहेत. खैरलांजीसारखे अत्यंत अमानुष माणूसकीला काळिमा फासणारे हत्याकांड हे या संताच्या भुमीत घडणारी अत्यंत लज्जास्पद बाब आहे. हे या समकालीन भीषण आमानुष हत्याकांड रोखण्यासाठी कोणीही खंबीर भूमिका घेताना दिसत नाही असे कवी राजकुमार मस्के यांना वाटते ते 'खैरलांजी हत्याकांड' या आपल्या कवितेत म्हणतात

आबा ... पुन्हा महाराष्ट्रात
खैरलांजी घडू देऊ नका
सोनई, टेंभूर्णी, खेर्डा
कधी उध्वस्त होणार हा अमानुष कोंडवाडा।

हा देश म्हणजेच एक कोंडवाडा आहे. असाच अनुभव येथील दलित, शोषित, पिडित माणसाला येत आहे. या कोंडवाड्याचे नाते दया पवारांच्या कोंडवाड्यांशी आहे. दया पवारांनी या देशातील सर्वसामान्यांचे अमानुष अन्याय अत्याचार टिपताना म्हटले होते

शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद कोणी निर्मिला हा कोंडवाडा

दया पवारांच्या कवितेतील हा कोंडवाडा जुना होता स्वातंत्र्यपूर्व काल खंडातील पार्श्वभूमी त्या कवितेत होती. परंतु आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही हा कोंडवाडा अभेद्य राहिला आहे. उलट तो अधिक भक्कम होत आहे. याचाच प्रत्यय आजच्या समाज जीवनात येत आहे. या देशातील या जातिभेदानेच रोहित वेमुलाचाही बळी घेतला आहे राहित वेमुलाची आत्महत्या हे या देशातील जातिभेदाचे एक प्रतिक आहे.या रोहित वेमुलाच्या आत्महत्येची असाह्य वेदना व्यक्त करताना कवी राजकुमार मस्के म्हणतात

प्रिय रोहित वेमुला
केव्हातरी जाणे असतेच
माणसाचे
अवेळी तू गेलास
वेदना असह्य झाली

रोहित वेमुलाचा हा बळी या देशातील जातिभेदाचा युगानुयुगाचा पारंपरिक व ऐतिहासिक वारसाच आहे. स्वातंत्र्यात माणसाचा मृत्यूही किती स्वस्त झाला आहे. याचा हा जिवंत दाखलाच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समान न्याय ही नवसमाजरचनेची नव मूल्ये दिली. येथील समस्त आंधळ्यांना सम्यक दृष्टी दिली; परंतु ही मूल्ये समाजात आजही रुजली नाहीत. उलट या तत्त्वांची आज पायमल्लीच होताना दिसत आहे. हा आशय व्यक्त करताना संविधान निर्मात्यास उद्देशून कवी अविनाश बनसोडे लिहितात

तू अस्ताला गेल्यावर ह्या जन्मांधाची घोर फसवणूक केली
इथल्या काही चकाकणाऱ्या काजव्यांनी
पुसटशा प्रकाशाची लालूच दाखवून...
आणि सुरू झाला एक लॉगमार्च ... पण उलट्या दिशेने
प्रत्येक काळरात्र जागविली जाते ... उद्याच्याच आशेने

या देशातील सर्वसामान्य माणसांचा प्रतिनिधी होऊन बोलताना कवी वाचकांना अंतर्मुख करतात. स्वातंत्र्याच्या राज्यात दररोज मोर्चे आंदोलने निघतात तरीही गरिबांना न्याय मिळत नाही. त्यांच्या डोळ्यात निराशा आहे. आशेचा किरण आज नाही तर उद्या येईल म्हणून हे लोक जगतात; परंतु त्यांच्या डोळ्यात धूळच फेकली जाते. हे वास्तव कविने आपल्या या कवितेतून जिवंतपणे चित्रित केले आहे.

संसदीय शासनप्रणालीची आदर्श राज्यसंहिता बाबासाहेबांनी संविधानाच्या रूपाने देशाला दिली आहे. पण संसदीय लोकशाहीच्या देशात अध्यक्षीय शासन प्रणालीचा हुकुमशाहीचा, ठोकशाहीच्या व गुंडगिरीचाच प्रत्यय येताना दिसतो. ही सामाजिक व राजकीय स्थिती प्रकट करताना कवी भूषण रामटेके लिहितात

संसदीय लोकशाहीचे वस्त्रहरण होण्याचे हे दुसरे वर्ष
अध्यक्षीय प्रणाली आता कुठे रांगायला लागलीय
कुठुन कुठं चालणार हा प्रवास
रामजादे विरुध्द हरामजादे अश्शी फुट
पाडताहेत ठरवून

ज्यांच्या हातात सत्ता गेली तेही जातदांडगेच आहेत. म्हणून ते आपली सत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी जाती-जातीत व गटा-गटात भांडणे लावतात व स्वार्थाची आपली पोळी भाजून घेतात, हे वास्तच या कवितेतून प्रकटले आहे.

अशा या एकारलेल्या सत्तेत येथील सर्वसामान्य माणूस प्रचंड भयग्रस्त आहे. अन्यायग्रस्तांना न्याय मिळत नाही आणि गुन्हेगारांना शिक्षा मिळत नाही. असेच चित्र आज दिसून येत आहे. गुन्हा करणारा शाबूत असतो. आणि त्याची शिक्षा दुसऱ्याच कोणा तरी निरापराध माणसाला भोगावी लागते हे वर्तमानकालीन भयावह वास्तव प्रकट करताना कवी सतीश मस्के लिहितात

याच स्वीकारलेल्या
लोकशाहीच्या राज्यात

गुन्हा करतात कोण
अन् सजा होते कुणाला?
हेच कळत नाही

अशा प्रश्नांकित शैलीतून वाचकांनाच स्वातंत्र्याबद्दल विचारमग्न करण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. येथील सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळत नाही. हाच खरा अन्याय आहे न्याय देवतेचे हे आधुनिक स्वरूपाचे असलेले आंधळेपण 'न्यायदेवता' या कवितेत प्रकट झाले आहे.

न्यायदेवता आंधळी अन्
कायदा गाढव आहे...
म्हणतात तेच खरं आहे
कारण...
खऱ्यांना न्याय मिळत नाही
खोट्यांना सजा होत नाही
हे दिसत असूनही
बघत नाही
म्हणून न्यायदेवता
आंधळी आहे

लोकशाहीतील ठोकशाही आणि बंदूकीच्या गोळीवर चालणारी येथील सत्ता यांचा ज्वलंत आविष्कार प्रस्तुत काव्यपंक्तीमधून प्रकट होतो.

मराठीतील आंबेडकरी काव्य लेखनाची परंपरा खूप जुनी आहे. दलितांच्या वेदनेला संत चोखामेळा याच्यापासून प्रारंभ झाला होता. चोखामेळावर या व्यवस्थेकडून होणारा अन्याय त्यानी शब्दबध्द केला आहे. चोखामेळाचे दुःखणे प्रामुख्याने आध्यात्मिक स्वरूपाचे होते; परंतु येथील समग्र दलित, शोषित व पिडित जनतेचे दुःखणे हे केवळ आध्यात्मिक स्वरूपाचे नाही, तर ते सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्वरूपाचे आहे आणि या सर्व प्रकराच्या विषमतेतून निर्माण झालेले येथील सर्वसामान्य माणसाचे दुःख नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत समृध्द असे संविधान भारताला दिले. परंतु या संविधानराची पायमल्ली झाल्यामुळे आदर्श असलेली लोकशाही व त्या लोकशाहीला व बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली समताधिष्ठित समाजरचना अद्यापर्यंत निर्माण होऊ शकली नाही. उलट पूर्वीच्याच अनेक समस्या वाढत जात आहेत. सत्ताधिशांची गुंडशाही व झुंडशाही वाढत आहे. त्यात सर्वसामान्य माणूस पिळला जात आहे. जातिभेद, धर्मयुध्द, भ्रष्टाचार व वशिलेबाजीने देशात धुमाकुळ घातला आहे. या सामाजिक वास्तवाचे चित्रण आलीकडे आंबेडकरी कवितेतून मोठ्या प्रमाणात येऊ लागले आहे. आंबेडकरी अनुयांयाचे व येथील सर्वसामान्य माणसांचे प्रश्न अलीकडे खूपच वाढत असल्यामुळे ते कवितेतूनही मोठ्या प्रमाणात चित्रित होत आहेत. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधातून समकालीन काही कवीच्या कवितांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

१. आंबेडकरी कवितेतून दलित शोषित माणसाची युगानुयुगाची वेदना व्यक्त झाली आहे.
२. आंबेडकरी कवितेला बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा आहे.
३. बाबासाहेबांनी संविधानातून आंबेडकरी अनुयायांना न्याय मिळवून दिल्याचे अनेक कवीने सांगितले आहे.
४. बाबासाहेबांनर संविधाच्या माध्यामातून दिलेली आदर्श मुल्ये समाजात रूजली नाहीत. म्हणून आदर्श समाजव्यवस्था निर्माण होऊ शकली नाही याचा प्रत्यय आंबेडकरी कवितेतून येतो.
५. स्वातंत्र्याचिंतन हा आंबेडकरी कवितेचा महत्त्वपूर्ण विषय बनला आहे.
६. बाबासाहेबांचे आदर्श संविधान समाजात रूजले नसल्यामुळे येथील दलित, शोषित, पिडित माणसांवरील अन्याय अत्याचार संपले नाहीत याचा प्रत्यय आंबेडकरी कवितेतून येतो.
७. आंबेडकरी कविता ही वर्तमानकालीन स्वांतत्र्यातील दुःखी माणसांच्या जगण्यातील समस्या जिवतंपणे मांडताना दिसते.

**संदर्भ :-**


१. (संपा.) डॉ. पद्माकर तामगाडगे, 'आंबेडकरी कविता', निर्मिती संवाद, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, आक्टोबर २०१५.

२. (संपा.) आत्माराम गोडबोले, 'दि इन्फोनिट बाबासाहेब' डिंपल पब्लिकेशन पालघर, प्रथमावृत्ती, एप्रिल २०१७.

३. राजकुमार मस्के, 'मारेकरी जेव्हा मातीला येतात', सर्वोदय प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, मे २०१६.

४. अस्मितादर्श, (त्रेमासिक), जाने., फेब्रू., मार्च २०१७.